खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

ता.खेड, जि.पुणे 410505

भूगोल विभाग

**वार्षिक अहवाल २०२२ – २३**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये भूगोल विषय सामान्य तसेच विशेष स्तरावर शिकविला जातो. महाविद्यालयात भूगोल विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयात भूगोल विषय प्रथम वर्ष कला आणि वाणिज्य या वर्गासाठी सामान्यस्तरावर तर द्वितीय व तृतीय वर्ष कला या वर्गासाठी विशेष स्तरावर भूगोल विषयाचे अध्यापन केले जाते. शैक्षणिक वर्ष 2022 – 23 साठी एस. वाय. बी. ए. या वर्गासाठी 46 तर टी. वाय. बी. ए. साठी 36 विद्यार्थ्यांनी विभागामध्ये प्रवेश घेतला. विभागात टी. वाय. बी. ए. च्या विद्यार्थ्यांनी एस. वाय. बी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन केले. विभागामध्ये भूगोल मंडळाच्या उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी वर्षभरामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भूगोल विभागामध्ये विद्यार्थ्यांना परिसरातील भौगोलिक प्रश्नाची जाणीव व्हावी, तसेच त्यांना सभोवतालच्या परिसंस्थांचे आकलन व्हावे म्हणून भूगोल विभागामध्ये ग्रामसर्वेक्षणाच्या निमित्ताने तालुक्यातील विविध गावांमध्ये क्षेत्रभेटीचे आयोजन केले. महाविद्यालाच्या गुगल क्लासरूमवर विभागाकडून प्रथम वर्ष कला/वाणिज्य, एस. वाय. बी. ए. आणि टी. वाय. बी. ए. या वर्गासाठी विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य अपलोड करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिकांची माहिती पीपीटीच्या साहयाने देण्यात आली. भूगोल विषयाच्या सहा पेपरच्या नोटस् संगणकावर तयार करून विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आल्या तसेच प्रात्यक्षिकांच्या संदर्भातील सर्व पीपीटी तयार करून विभागामार्फत घेण्यात आलेल्या ऑनलाईन टेस्टला विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणात प्रतिसाद दिल्याचे आढळून आले. प्रा. एम. एल. मुळूक यांनी विद्यार्थ्यांना भूमापनासंदर्भातील सर्वेक्षणाचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामध्ये विभागातील सर्व विद्यार्थी सहभागी झालेले होते. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना लोलकीय होकायंत्र सर्वेक्षण, समतलफलक सर्वेक्षण, डंपी लेव्हल सर्वेक्षण, थेडोलाईट सर्वेक्षण, या उपकरणांचे प्रशिक्षण दिले. या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांच्या

अभ्यासास आणि अभ्यासपूरक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विभागातील सर्व विषयांचे निकाल उत्तम लागले. तसेच विद्यार्थ्यांसाठी सेमीनार, गटचर्चा, नकाशा निर्मित्ती स्पर्धा, भूरूप चित्रकला स्पर्धा, स्पर्धा परीक्षा संदर्भात मार्गदर्शन, निबंध स्पर्धा, लेखन कौशल्य आणि अभ्यास कौशल्य कार्यशाळा, तसेच पदव्युत्तर प्रवेश परीक्षासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. विभागातील प्राध्यापक विविध ठिकाणी आयोजीत करण्यात आलेल्या चर्चासत्रात सहभागी होऊन शोधनिबंधाचे वाचन केले. प्रा. दिलीप मुळूक यांचे दोन, प्रा. डी. एम. मारकड यांचे दोन, प्रा. एम. एल. मुळूक यांचा एक शोधनिबंध विविध नियतकालिकांमध्ये प्रसिध्द झाले. प्रा. दिलीप मुळूक यांची दोन पेटेंट प्रकाशित झाली.



प्रा. डॉ. दिलीप मुळूक
भूगोल विभाग प्रमुख